फोन.नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, कराड पिन – ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअमक/वि.वि./2024/ 214

दिनांक :- 15 JAN 2024.

## परिपत्रक

**केंद्र शासनाची भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची 60 टक्के रक्कम ही विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेली असून सदर रक्कम महाविद्यालयास 7 दिवसाच्या आत तात्काळ जमा करणेबाबत...**

केंद्र शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे. सदर योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 17 मार्च 2022 व दिनांक 07 जुलै 2023 च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची 60 टक्के हिश्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्याची रक्कम वजा करून उर्वरीत शुल्क, परिक्षा शुल्क, इतर ना परतावा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास 07 दिवसाच्या आत तात्काळ जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

गेल्या काही दिवसापासून सामाजिक न्याय व विशेष विभागामार्फत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सन 2021-22 व सन 2022-23 या शैक्षणिक वर्षातील 60 टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये शिष्यावृत्ती जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झालेली आहे किंवा जमा होणार आहे अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागातून अचूक रक्कम तपासूनच सदरील रक्कम महाविद्यालयास ( रोखपाल विभागात ) जमा करावी. असे अहवान समाज कल्याण, यांच्या विभागामार्फत करण्यात येत आहे. या प्रमाणे कार्यवाही न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

( डॉ.वि.ना.कुलकर्णी )
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, कराड

प्रत.- 1. सर्व सूचना फलकांवर लावणेकरीता.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. स्थापत्य विभाग. | 2. विद्युत विभाग. | 3. यंत्र विभाग. | 4.अणुविद्युत व दूरसंचार विभाग. |
| 5. माहिती तंत्रज्ञान विभाग. | 6.विद्यार्थी विभाग. | 7. वसतीगृह विभाग. ( मुलांचे व मुलींचे ) | |

2. संस्थेच्या संकेत स्थळावरती. ( अपलोड करणेकरीता ).

Scanned with OKEN Scanner